
# विद्यार्थी साहाय्यक समिती
## पुणे

# Vidyarthi Sahayyak Samiti, Pune



वार्षिक अहवाल

२०२१–२०२२

www.samiti.org

# विश्वस्त मंडळ



**पद्मश्री प्रताप पवार**
अध्यक्ष



**डॉ. भाऊसाहेब जाधव**
कार्याध्यक्ष,
मराठवाडा मित्रमंडळ, पुणे



**विजय पुसाळकर**
अध्यक्ष, इंडो शॉटले प्रा. लि.



**तुकाराम गायकवाड**
कार्यकारी विश्वस्त,
उद्योजक



**संजय अमृते**
खजिनदार,
बँकिंग व वित्त क्षेत्र



**रमाकांत तांबोळी**
सामाजिक कार्यकर्ते
(निधन : ५ मे २०२२)



**सुप्रिया केळवकर**
शिक्षणतज्ज्ञ



**सुमन करंदीकर**
शिक्षणतज्ज्ञ
(निधन : २८ जून २०२१)



**तुषार रंजनकर**
उद्योजक



**तेज निवळीकर**
माजी मानद संचालक,
बहि:शाल शिक्षण मंडळ, सा.फु. पुणे विद्यापीठ



**रत्नाकर मते**
अभियांत्रिकी सल्लागार



**सुनंदा माने**
संचालक, लाही



**जिभाऊ शेवाळे**
बँक अधिकारी



**राजेंद्र ततार**
(समुपदेशक)


# संस्थापक



संस्थापक
**डॉ. अच्युत शंकर आपटे**



सुमित्रा केरकर



हरिभाऊ फाटक

## समितीचे घोषवाक्य

सर्वांगीण शिक्षणातून युवा सक्षमीकरण

## ध्येय (Mission)

समाजाच्या मदतीने आर्थिकदृष्ट्या गरजू आणि होतकरू युवकांच्या सक्षमीकरणासाठी योग्य सुविधा व संधी उपलब्ध करून देणे

## समितीचे धोरण

योग्य व्यवस्थापन व गुणवत्तापूर्ण कार्यप्रणाली

शालेय शिक्षणानंतर शहरात शिक्षणासाठी येणाऱ्या युवावर्गाची भोजन व निवासाची उत्तम सोय करणे

समितीची मूल्ये रुजविणे

जात, धर्म, पंथ निरपेक्ष विकास

कालानुरूप विविध कौशल्ये विकसित करण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे

युवकांच्या सक्षमीकरणासाठी व उद्योजकता रुजविण्यासाठी प्रयत्न करणे


सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव असलेल्या व्यक्ती आणि संस्था यांच्यातर्फे आर्थिक तथा सर्वंकष पाठबळ मिळविण्याचे सतत प्रयत्न करणे.

## मूल्ये

स्वच्छता, समता, श्रमप्रतिष्ठा, स्वावलंबन, व्यक्तिमत्त्व विकास, समाजाप्रती उत्तरदायित्व

## हेतू

उच्चशिक्षणासाठी पुण्याला येणाऱ्या गरजू व होतकरू ग्रामीण विद्यार्थ्यांना अल्प दरात वसतिगृह व भोजन यांची उत्तम सुविधा पुरवणे. दुर्बल घटकांतील विद्यार्थी आत्मविश्वासपूर्ण, स्वावलंबी व समाजाचा जबाबदार घटक व्हावेत, यासाठी पोषक वातावरण व तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देणे. त्यातून सामाजिक स्तर उंचावणे.



# समितीचे कार्य

ग्रामीण भागातून उच्च शिक्षणासाठी पुण्यात येणाऱ्या गरीब, हुशार आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी अल्प दरात निवासाची व भोजनाची सोय व्हावी व त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास व्हावा, उद्योजकतेचे बाळकडू त्यांना मिळावे हा विद्यार्थी साहाय्यक समितीचा उद्देश आहे. हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून समितीच्या कामाकडे पाहिले जाते. समिती धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० अंतर्गत नोंदणीकृत (क्र. २१९ ई, पुणे) असून संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण भारतभर आहे.

समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल परंतु गुणवत्तेच्या जोरावर काहीतरी ध्येय ठेवून धडपडणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना मदतीच्या हेतूने ज्येष्ठ गणितज्ज्ञ डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्यसेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी १९५५ मध्ये या कामाला सुरुवात केली. त्यावेळी स. प. महाविद्यालय, फर्ग्युसन महाविद्यालयात जेवणाच्या क्लबमध्ये विद्यार्थ्यांसाठी जेवण सुरू केले. पुढे निवासव्यवस्था वाढविली. सध्या विद्यार्थ्यांसाठी तीन व विद्यार्थिनींसाठी दोन अशी संस्थेची पाच वसतिगृहे असून त्यांतून सुमारे ७५० विद्यार्थी-विद्यार्थिनी या सुविधांचा लाभ घेत आहेत. अहमदनगर येथेही समितीची शाखा लवकरच सुरू होणार आहे. साहाय्यदात्यांकडून मिळणाऱ्या आर्थिक साहाय्यावर आणि विद्यार्थ्यांकडून येणाऱ्या अल्प शुल्कावर संस्थेचा योगक्षेम सुरू आहे. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा ही संस्थेची त्रिसूत्री आहे. देशासाठी जबाबदार नागरिक घडवणे यासाठी संस्थेचे अखंड प्रयत्न सुरू आहेत. प्रत्येक सत्रात प्रवेशासाठी जागा उपलब्ध असतात. डिप्लोमा, आयटीआय, बारावीनंतरच्या पदवीपर्यंतच्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश असतो.





## विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम

पहाटे योगासने, संस्थेसाठी रोज अर्धा तास श्रमदान, कमवा व शिका योजनेतील सहभाग, देणगीदार पालकांची महिन्यातून एकदा भेट या गोष्टी विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य असतात. वाचनालय व अभ्यासिका संगणक प्रशिक्षण व सराव, वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहेत. शिवाय खेळ, मान्यवरांची व्याख्याने, गटचर्चा, सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धा, उद्योजकता विकास यातून त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास घडविण्याचा प्रयत्न केला जातो.

## समाजाचा पाठिंबा

सहा दशकांहून अधिक काळ सुरू असलेल्या या कार्याला समाजाचा मोठा आर्थिक पाठिंबा आहे. कोणत्याही शासकीय मदतीवर अवलंबून न राहता केवळ समाजाच्या मदतीवरच हे कार्य सुरू राहावे, अशी संस्थापकांची इच्छा होती. काही साहाय्यदाते पिढ्यान्‌पिढ्या संस्थेशी जोडलेले आहेत. पारदर्शी कारभार आणि युवा परिवर्तनाच्या कार्यामुळे आपल्या मदतीचा योग्य विनियोग साहाय्यदाते अनुभवू शकतात.

# समाजाचा विश्वास

**प्रतापराव पवार, अध्यक्ष**

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कार्यावरचा देणगीदार, हितचिंतकाचा विश्वास म्हणजे आमच्यासाठी ती पावती आहे. समितीने आजवर जी मूल्ये जपली आणि युवा परिवर्तनाचे प्रयत्न केले त्यामुळेच पिढ्यानपिढ्याचे देणगीदार समितीशी जोडले गेले आहेत. त्याबरोबच ध्येयवादी कार्यकर्ते, निष्ठावान कर्मचारी, अभ्यासू सल्लागार यांच्यामुळे संस्थेचे क्षितीज विस्तारते आहे. या सर्वांविषयी मनात कायम कृतज्ञता आहे. संस्थेच्या दृष्टीने आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट म्हणजे मोठ्या संख्येने माजी विद्यार्थी संस्थेसाठी वेळ देत आहेत. ज्या तळमळीने आणि निष्ठेने ते काम करतात, त्यामुळे संस्थेत आधुनिकता तर येत आहेच शिवाय खऱ्या गरजूंपर्यंत पोचण्यास मदत होते.

कोरोना महामारीच्या काळातून बाहेर आल्यावर समितीचे कार्य नेहमीप्रमाणे सुरू झाले. डिसेंबरपासून नियमित प्रवेश द्यायला सुरुवात झाली, परंतु अनेक विद्यार्थ्यांसमोर विविध प्रश्न असल्याने पुण्यात येण्याबाबत अनेकांच्या मनात शंका होत्या. मुलाखतीच्या वेळी या प्रश्नांची दाहकता कार्यकर्त्यांना जाणवली आणि समितीला अजून खूप काही करायचे आहे, हे लक्षात आले. या तरुणाईची प्रश्नांना भिडण्याची तयारी, परिस्थितीवर मात करण्यासाठीचा संघर्ष आणि शिक्षणातून उत्कर्ष साधण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा पाहून समिती अजून अनेकांपर्यंत पोचली पाहिजे या मताशी आम्ही आलो आहोत.

ग्रामीण भागातील पालकांची शिक्षणाबाबत जागरूकता वाढली आहे. खेड्यातील मुलीही जिद्दीने शहरापर्यंत पोचत आहेत. सुरक्षित वातावरण आणि परवडणारा खर्च म्हणून गेली काही वर्षे समितीकडे प्रवेशासाठी मुलींची रांग वाढते आहे. त्यामुळे अजून एक मुलींचे वसतिगृह बांधण्याचा निर्णय विश्वस्तांनी घेतला आणि काही दिवसांतच देणगीचा ओघ सुरू झाला. आर्थिक रुपात मदतीसाठी साहाय्यदाते जसे पुढे आले तसे या बांधकामाचे आरसीसी सल्लागार म्हणून केवळ एक रुपयात काम पाहण्याचेही एका हितचिंतकाने जाहीर केले. समिती कार्यावरचा हा विश्वास आम्हा सर्वांचे बळ वाढवणारा आहे. पुण्याबाहेर प्रथमच अहमदनगर येथे मुलांसाठी एक व मुलींसाठी एक अशी दोन वसतिगृहे बांधण्याचा निर्धार समितीने केला आहे. त्यासाठीही साहाय्यदाते उभे राहिले. विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ, मान्यवर जेव्हा समितीला भेट देतात तेव्हा त्यांच्या विचारांतून, कल्पनांतून अनेक गोष्टी पुढे येतात. युवा परिवर्तनासाठी समिती जी मूल्ये अवलंबत आहे ती मूल्ये समितीपर्यंत येऊ न शकणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत पोचवावीत अशी कल्पना पुढे आली. समितीची आजवर यशस्वी झालेली वसतिगृह कार्यप्रणाली कोर्सच्या रूपाने नवतरुणांपर्यंत पोचविण्यासाठी आणि समितीच्या विद्यार्थ्यांनी उद्योजकतेचा विचार करावा यादृष्टीने काही प्रयत्न सुरू केले आहेत. आपण सोबत आहातच. युवा परिवर्तनाच्या या कार्याला आपण हातभार लावला तर तरुणाई नक्कीच विधायक वळणाने पुढे जाईल, हा विश्वास आहे.



# समितीच्या शिरपेचात ‘आयएसओ’चा तुरा



**तुकाराम गायकवाड,** कार्यकारी विश्वस्त

यंदाचे आर्थिक वर्ष समितीसाठी नवी आव्हाने आणि त्याबरोबरच काही संधीही घेऊन आले. आव्हाने म्हणजे कोरोना महामारीच्या साथीमुळे जवळपास दीड वर्षे वसतिगृह सुरू नव्हते. लॉकडाऊनमुळे विद्यार्थी घरी अडकले, त्यांच्या शैक्षणिक आणि आर्थिक परिस्थिताचा प्रश्न होता. देणगीदारांनाही या स्थितीत समितीपर्यंत पोचता आले नाही. त्यामुळे आर्थिक प्रश्न निर्माण झाले. संधी म्हणजे, विद्यार्थी घरी अडकले तेव्हा शिक्षणाबाबतच्या चिंतेने त्यांना ग्रासले. अशावेळी कार्यकर्त्यांनी फोनद्वारे त्यांच्याशी संपर्क वाढवून त्यांना दिलासा देण्याचे काम करता आले. त्यातून डिजिटल प्लॅटफॉर्म उभा करण्याची गरज जाणवली आणि समितीकडे व्हिडिओ कॉन्फरन्स सुविधा उभी राहिली. विद्यार्थी नसल्यामुळे सर्व वसतिगृहांतील टॉयलेट ब्लॉकच्या नूतनीकरणाचे काम करता आले. याही वर्षी एप्रिल, मे महिन्यात रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका आणि कर्मचारी वर्गासाठी समितीतर्फे अन्नसेवा उपक्रम राबविला. खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोदकुमार सिंह यांनी समितीला भेट दिली. त्यांच्या संयुक्त विद्यमाने बोर्डाच्या जागेत समितीतर्फे वृक्षारोपण करण्यात आले. लोकसभेच्या माजी अध्यक्ष सुमित्रा महाजन यांनी समितीला भेट दिली. महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षण आयुक्त विशाल सोळंकी यांनी समितीचे कार्य जाणून घेतले आणि या कार्याचा प्रचार, प्रसार करण्यासाठी काय करता येईल, याविषयी काही कल्पना सांगितल्या. समितीच्या कमवा व शिका या अनिवार्य योजनेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाबरोबर सामंजस्य करार करण्यात आला.

यावर्षी साधारण जानेवारी महिन्यापासून विद्यार्थ्यांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली. १५ मार्चपर्यंत प्रवेश झाले. एकूण क्षमतेइतक्याही जागा भरल्या गेल्या नाहीत. विद्यार्थ्यांच्या मनात अनिश्चितता असल्यामुळे वसतिगृहात प्रवेश घेण्यासही ते धजावत नसल्याचे लक्षात येत होते. जे विद्यार्थी आले त्यांच्यातील अनेकांची कौटुंबिक परिस्थिती ढासळल्याचे निरीक्षण आहे. याचा विचार करता महागाई आणि खर्च वाढत असतानाही समितीने कोणतीही फी वाढविली नाही. प्रवेश झाल्यानंतर पुढची परिस्थिती कशी असेल, हे निश्चित करणे अवघड होते. हळूहळू सर्व सुरळीत झाले, परंतु जवळपास दीड – दोन वर्षांचा लॉकडाऊन काळ आणि ऑनलाइन शिक्षण असल्यामुळे मुलांची लेखी परीक्षेसाठीची मानसिक तयारी होत नसल्याची काही उदाहरणे समोर आली. त्यासाठीही समुपदेशन करावे लागले.

आनंदाची गोष्ट म्हणजे मार्च महिन्यात समितीला वसतिगृह व्यवस्थापन प्रणालीसाठी आयएसओ मानांकन प्राप्त झाले. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीनुसार युवा परिवर्तनासाठी चाललेले हे कार्य मानांकित झाले. समितीच्या स्वच्छ, लोकशाही आणि पारदर्शी कारभाराची समाजात जी ओळख आहे त्यावर या मानांकनाने मोहोर उमटविली गेली. थिंक टँकच्या माध्यमातून पाच वर्षांपूर्वी समितीने ज्या गोष्टी ठरवल्या होत्या, त्यातील ९० टक्के गोष्टींची पूर्तता झाली. आता पुढील पाच वर्षांचे नियोजन करतो आहोत. पुण्याबाहेर पहिल्यांदाच अहमदनगर येथे मुलांसाठी आणि मुलींसाठी येत्या दोन वर्षांत स्वतंत्र वसतिगृहे उभी राहतील. पुण्यातही मुलींसाठी अजून एक वसतिगृह उभे राहत आहे. समितीच्या सुविधांचा लाभ समितीबाहेरील विद्यार्थ्यांना कसा देता येईल, याचा विचार आहे. त्यादृष्टीने प्रयत्न करतो आहोत. आपल्यासारखे सृजन सोबत आहेत. तुमच्या सूचनांचे स्वागत आहे.

# वसतिगृहनिहाय विद्यार्थी संख्या

(डिसेंबर २०२१ ते मार्च २०२२)




डॉ. अच्युत शंकर आपटे
(मुली) १५५




सुमित्रा सदन
(मुली) ११८



लजपतराय विद्यार्थी भवन
(मुले) ११५







पी. डी. कारखानीस
(मुले) १६६

एकूण
६५६

नवीन लजपत
(मुले) १०२

## जिल्हानिहाय विद्यार्थी संख्या

| क्र. | जिल्हा | मुली | मुले | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | अहमदनगर | २५ | ५८ | ८३ |
| २ | अकोला | ० | ४ | ४ |
| ३ | अमरावती | ६ | १० | १६ |
| ४ | औरंगाबाद | १३ | २१ | ३४ |
| ५ | बीड | १५ | १७ | ३२ |
| ६ | भंडारा | ० | २ | २ |
| ७ | बुलढाणा | ४ | १५ | १९ |
| ८ | चंद्रपूर | १ | ७ | ८ |
| ९ | धुळे | ४ | १० | १४ |
| १० | गडचिरोली | ० | ३ | ३ |
| ११ | गोंदिया | ० | १ | १ |
| १२ | हिंगोली | २ | १ | ३ |
| १३ | जळगाव | ९ | १३ | २२ |
| १४ | जालना | ८ | ११ | १९ |
| १५ | कोल्हापूर | १ | ६ | ७ |
| १६ | लातूर | ८ | १५ | २३ |
| १७ | मुंबई | १ | २ | ३ |

# अभ्यासक्रमानुसार विद्यार्थी संख्या

| क्र. | अभ्यासक्रम | मुली | मुले | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | बी.ए. | ३८ | ४२ | ८० |
| २ | बी. बी. ए. | १ | ६ | ७ |
| ३ | बी. कॉम. | ३८ | ३८ | ७६ |
| ४ | बी.सी. एस. | ६ | २२ | २८ |
| ५ | बी. ई. | ३८ | ६० | ९८ |
| ६ | बी.एस.सी. | २८ | ६२ | ९० |
| ७ | बी. एस. एल. एल.एल. बी. | ० | ५ | ५ |
| ८ | डिप्लोमा | ४८ | ७१ | ११९ |
| ९ | अकरावी वाणिज्य | ० | ६ | ६ |
| १० | अकरावी कला | १ | ० | १ |
| ११ | अकरावी विज्ञान | ३ | ८ | ११ |
| १२ | इतर | ९ | ३ | १२ |
| १३ | एल. एल. बी. | २ | २ | ४ |
| १४ | एम. एस. सी. | ११ | ७ | १८ |
| १५ | एम. बी. ए. | १ | ० | १ |
| १६ | बी. ए. एम. एस. | ० | ० | ० |
| १७ | बारावी वाणिज्य | १ | ४ | ५ |
| १८ | बारावी विज्ञान | २ | ४ | ६ |
| १९ | आय.टी. आय. | ४ | २ | ६ |
| २० | एम. ए. | ० | २ | २ |
| २१ | बी. फार्म. | ६ | ५ | ११ |
| २२ | बी. सी. ए. | ८ | १५ | २३ |
| २३ | एम. एस. डब्ल्यू. | १ | १ | २ |
| २४ | बी. व्होक | १ | ० | १ |
| २५ | बी. ए. एल. एल. बी. | ८ | १२ | २० |
| २६ | बी. एस.सी. नर्सिंग | ५ | ० | ५ |
| २७ | पॅरामेडिकल | ९ | ४ | १३ |
| २८ | बी. एड. | १ | १ | २ |
| २९ | इंटेरिअर डिझाईन | ३ | १ | ४ |
| | **एकूण** | **२७३** | **३८३** | **६५६** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८ | नागपूर | २ | १० | १२ |
| १९ | नांदेड | ६ | १७ | २३ |
| २० | नंदुरबार | ४ | ६ | १० |
| २१ | नाशिक | ९ | १५ | २४ |
| २२ | उस्मानाबाद | १७ | १९ | ३६ |
| २३ | परभणी | १५ | १६ | ३१ |
| २४ | पुणे | ५८ | ६३ | १२१ |
| २५ | रायगड | ५ | ० | ५ |
| २६ | रत्नागिरी | १ | ० | १ |
| २७ | सांगली | १६ | ७ | २३ |
| २८ | सातारा | १२ | ९ | २१ |
| २९ | सिंधुदुर्ग | २ | ० | २ |
| ३० | सोलापूर | १२ | १६ | २८ |
| ३१ | ठाणे | १ | १ | २ |
| ३२ | वर्धा | ८ | १ | ९ |
| ३३ | वाशिम | १ | ३ | ४ |
| ३४ | यवतमाळ | ७ | ४ | ११ |
| | **एकूण** | **२७३** | **३८३** | **६५६** |

## महाविद्यालयनिहाय विद्यार्थी संख्या

| क्र. | महाविद्यालय | मुली | मुले | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | आबासाहेब गरवारे कॉलेज ऑफ आर्टस अँण्ड सायन्स | ४ | १२ | १६ |
| २ | आबासाहेब गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स | ५ | १२ | १७ |
| ३ | अभिनव कला महाविद्यालय | १ | ० | १ |
| ४ | एआयएसएसएमएस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग | ८ | १७ | २५ |
| ५ | एआयएसएसएमएस कॉलेज ऑफ फार्मसी | ० | ५ | ५ |
| ६ | एआयएसएसएमएस इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी | २ | ४ | ६ |
| ७ | औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय, औंध) | १ | ० | १ |
| ८ | बृहन महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स | १२ | १४ | २६ |
| ९ | कुस्रो वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी | १ | १ | २ |
| १० | डी. वाय. पाटील कॉलेज आकुर्डी | ० | ३ | ३ |
| ११ | फर्ग्युसन महाविद्यालय | ४८ | ५१ | ९९ |
| १२ | गेनबा सोपानराव मोझे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग | ० | ४ | ४ |
| १३ | शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय | ४६ | ८० | १२६ |
| १४ | आयएलएस लॉ कॉलेज | ० | ४ | ४ |
| १५ | महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी | ० | ५ | ५ |
| १६ | मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ कॉमर्स | १९ | १० | २९ |
| १७ | एम.आय्.टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग | ० | ३ | ३ |
| १८ | मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट, सायन्स अँण्ड कॉमर्स, गणेशखिंड | २२ | ३५ | ५७ |
| १९ | मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट, सायन्स अँण्ड कॉमर्स, शिवाजीनगर | ४२ | ३८ | ८० |
| २० | नौरोजी वाडिया कॉलेज | २ | ३ | ५ |
| २१ | सिंहग़ड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग | ० | ३ | ३ |
| २२ | सर परशुरामभाऊ महाविद्यालय | ४ | ५ | ९ |
| २३ | एस. एन. डी. टी. आर्टस अँण्ड कॉमर्स कॉलेज | १ | ३ | ४ |
| २४ | श्री सिद्धीविनायक आर्टस अँण्ड कॉमर्स महिला महाविद्यालय | १ | ० | १ |
| २५ | डी. ई. सोसायटी टेक्निकल इन्स्टिट्यूट | ४ | ८ | १२ |
| २६ | मॉडर्न कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, शिवाजीनगर | २४ | २८ | ५२ |
| २७ | महर्षि कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे बी.एड. कॉलेज फॉर वूमन | १ | ० | १ |
| २८ | डी. ई. सोसायटी एस. के. जिंदाल कॉलेज ऑफ नर्सिंग | १ | ० | १ |
| २९ | सूर्यदत्ता कॉलेज ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी | ० | १ | १ |
| ३० | मूकबधीर शिक्षण संशोधन केंद्र, पुणे (आपटे प्रशाला) | ० | ५ | ५ |
| ३१ | विद्या महामंडळ | ० | ४ | ४ |
| ३२ | एच. व्ही. देसाई कॉलेज | ७ | ० | ७ |
| ३३ | यशवंतराव चव्हाण लॉ कॉलेज | १ | ० | १ |
| ३४ | बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय | ८ | ५ | १३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३५ | मराठवाडा मित्र मंडळ शंकरराव चव्हाण लॉ कॉलेज | ३ | ७ | १० |
| ३६ | आयएसबीएम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग | ० | ३ | ३ |
| ३७ | भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग लवळे | ० | १ | १ |
| ३८ | पूना कॉलेज ऑफ फार्मसी | ० | १ | १ |
| ३९ | भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग फॉर वुमन | १ | ० | १ |
| ४० | डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पिंपरी | ० | १ | १ |
| ४१ | अभिनव एज्युकेशन सोसायटी कॉलेज ऑफ फार्मसी, नऱ्हे | ० | १ | १ |
| ४२ | पुणे फार्मसी, एरंडवने | १ | ० | १ |
| ४३ | पुणे विद्यार्थीगृह कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग | १ | ५ | ६ |
| ४४ | मॉडर्न एज्युकेशन सोसायटी इंजिनिअरिंग कॉलेज ऑफ पुणे | १ | १ | २ |
| ४५ | श्री नवलमल फिरोदिया लॉ कॉलेज (फर्ग्युसन आवार) | १ | ० | १ |
| | **एकूण** | **२७३** | **३८३** | **६५६** |







## समितीला आयएसओ मानांकन

विद्यार्थी साहाय्यक समितीचे काम पारदर्शक आहे. समितीने आपल्या कामाची कार्यप्रणाली लिखित करायचे ठरविले. आयएसओसाठी डिसेंबर ते मार्च दरम्यान कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षणही घेतले आणि आयएसओ ९००१ : २०१५ प्रमाणपत्राद्वारे समितीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला. आयएसओ सर्टिफिकेशनचे डॉ. सुरेश माळी यांच्या हस्ते समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांनी हे प्रमाणपत्र स्वीकारले.

# वर्षभरातील उपक्रम

## आरोग्य सेवकांसाठी अन्नसेवा

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत (एप्रिल ते जून) वाढत्या रुग्णसंख्येमुळे डॉक्टर, परिचारिका आणि सर्वच आरोग्य कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण आला होता. छोटी रुग्णालये तसेच कोरोना रुग्णांसाठी उभारलेली तात्पुरती रुग्णालये यांमध्ये जेवणाची सोय नव्हती. तेथे समितीच्या वतीने दररोज सुमारे अकराशे जणांना दोन वेळचे जेवण पुरवले.

## समिती आशीर्वाद वृक्ष योजना

दि. १७ जुलै २०२१ रोजी खडकी कन्टोन्मेंट बोर्डाच्या रेंजहील्स रोड येथे समिती आशीर्वाद वृक्ष योजनेअंतर्गत झाडे लावण्यात आली. यावेळी समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार, कार्यकारी विश्वस्त तुकाराम गायकवाड, खडकी कँन्टोन्मेंट बोर्डाचे सीईएओ प्रमोद्कुमार सिंह, विनायक खंडकर, कार्यकर्ते व माजी विद्यार्थी उपस्थित होते. येथे समितीच्या विद्यार्थ्यांना कमवा-शिका अंतर्गत काम मिळणार आहे.

## पुणे विद्यापीठाशी सामंजस्य करार

समितीमध्ये कमवा- शिका योजना अनिवार्य आहे. ज्यामुळे विद्यार्थ्यांना थोडे पैसे मिळतात आणि त्यांच्यामध्ये श्रम संस्काराचे महत्त्व रुजते. यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि विद्यार्थी साहाय्यक समिती यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. त्यानुसार विद्यार्थ्यांना विविध कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळून त्यांना स्वयंपूर्ण होण्यास मदत होईल.

## डॉ. आपटे वसतिगृहाचे नूतनीकरण

समितीच्या डॉ. अ. शं. आपटे वसतिगृहाचे नूतनीकरण करण्यात आले. सुमारे १८० विद्यार्थिनींच्या निवासाची सोय असलेल्या या वसतिगृहात अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या. या नूतनीकरणाचे उद्‌घाटन १४ ऑगस्ट २०२१ रोजी लोकसभेच्या माजी अध्यक्षा सुमित्रा महाजन यांच्या हस्ते झाले.

## स्थापनादिनी देणगीदारांचा स्नेहमेळावा



विद्यार्थी साहायक समितीचा स्थापनादिन (१३ नोव्हेंबर) पहिल्यांदाच साजरा करण्यात आला. यावेळी हितचिंतक व देणगीदारांचा स्नेहमेळावा झाला. या मेळाव्यात अडीचशेहून अधिक देणगीदार आणि हितचिंतक सहभागी होते. दिलेल्या निधीचा सुयोग्य विनियोग होणार, याची खात्री असल्यानेच आम्ही या संस्थेला देणगी दिली आणि नंतर या संस्थेशी कायमचे जोडले गेलो, अशी भावना यावेळी देणगीदारांनी व्यक्त केली. समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार, मराठवाडा मित्रमंडळाचे भाऊसाहेब जाधव, समितीचे देणगीदार, हितचिंतक विनायक आणि सौ. किशोरी खंडकर, सुप्रिया कवठेकर, सुभाष कोटस्थाने यांच्या कन्या प्रिया कोटस्थाने, नीता गुळवणी, प्रकाश आपटे, भारत फोर्जचे राहुल लाळे यांनी याप्रसंगी मनोगत व्यक्त केले. स्नेहमेळाव्याच्या उत्तरार्धात जितेंद्र अभ्यंकर आणि वर्षा भिडे यांचा 'गाता रहे मेरा दिल' हा हिंदी-मराठी गीतांचा कार्यक्रम झाला.

## संकेतस्थळ अद्ययावत

विद्यार्थी साहाय्यक समितीचे संकेतस्थळ www.samiti.org अद्ययावत करण्यात आले. समितीची स्थापनेपासूनची माहिती तसेच सर्व उपक्रमांची माहिती या संकेतस्थळावर आहे.

## वसतिगृहांमधील स्वच्छतागृहांची दुरुस्ती

समितीच्या इमारती साधारण ३५ ते ४० वर्षे जुन्या झाल्याने दुरुस्त्यांची गरज होती. लॉकडाऊनच्या काळात वसतिगृहात विद्यार्थी-विद्यार्थिनी नसल्याने पाचही वसतिगृहांतील स्वच्छतागृहांचे नूतनीकरण करण्यात आले.

## अहमदनगरमध्ये वसतिगृह होणार

समितीने प्रथमच पुण्याबाहेर अहमदनगर येथे मुलांच्या वसतिगृहासाठी ९१३.६४ चौरस मीटर स्वतःच्या मालकीची जागा खरेदी केली. २८ डिसेंबर २०२१ रोजी हा करार झाला. नालेगाव-कल्याणरोड येथे ही जागा आहे. खरेदीसाठी सुमारे दोन कोटी रुपये लागले. नगरमध्ये १८ जून २०१९ ला प्रेमदान चौकात जागा भाडे तत्वावर घेऊन वसतिगृह सुरू केले होते. कोरोनाच्या काळात ते बंद ठेवावे लागले. विद्यार्थ्यांचा प्रतिसाद कमी झाल्यामुळे व खर्च वाढत असल्याने ३० सप्टेंबर २०२१ पासून हा भाडेकरार संपुष्टात आणून हे वसतिगृह बंद केले.

## व्हिडीओ कॉन्फरसिंग सुविधा

एखाद्या कार्यक्रमाला, बैठकीला एकाच वेळी सर्व वसतिगृहांतील मुलांना सहभागी होता यावे, यासाठी व्हिडीओ कॉन्फरन्सची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. या यंत्रणेसाठी डेलवाल फ्लो कंट्रोल्स या कंपनीचे अर्थसाह्य लाभले आहे.



## शिक्षण आयुक्तांची भेट

राज्याचे शिक्षण आयुक्त विशाल सोळंकी यांनी २ मार्चला समितीला भेट देऊन पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. शासकीय वसतिगृहांच्या कामात सुसूत्रता आणण्यासाठी समितीच्या कार्यप्रणालीचा तेथे अवलंब करण्याचा त्यांचा विचार असून त्या दृष्टीने आराखडा तयार करण्यास सुरुवात झाली. त्यानंतर झालेल्या एका कार्यक्रमात श्री. सोळंकी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना यशाचा मंत्र दिला.

## कागदपत्रांचे डिजीटायझेशन

समितीच्या स्थापनेपासून आतापर्यंतच्या सर्व कागदपत्रांचे डिजीटायझेशन पूर्ण झाले. सुमारे ८३ हजार कागदपत्रे स्कॅन करण्यात आली. पुण्यातील मॉड्युलर इन्फोटेक कंपनीचे यासाठी सहकार्य लाभले.

## समितीच्या लेकींचा स्नेहमेळावा



समितीच्या माजी विद्यार्थिनींचा मेळावा ३ ऑक्टोबर २०२१ रोजी आपटे वसतिगृहातील मोडक सभागृहात झाला. मेळाव्यासाठी महाराष्ट्राच्या विविध भागातून विद्यार्थिनी आल्या होत्या. समिती विद्यार्थिनींसाठी नव्याने बांधत असलेल्या वसतिगृह प्रकल्पासाठी मदत करण्याचे आणि समितीच्या विविध उपक्रमात सहभाग घेण्याचे यावेळी त्यांनी जाहीर केले.



## डॉ. अच्युतराव आपटे स्मृतिदिन

डॉ. अच्युतराव आपटे स्मृतिदिनानिमित्त (८ जानेवारी) अच्युतराव आठवताना या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. डॉ. दीपक शिकारपूर, डॉ. सुधाकर न्हाळदे, सुभाषचंद्र भोसले, तुकाराम गायकवाड उपस्थित होते. यावेळी अच्युतरावांच्या आठवणींना उजाळा दिला.

## नवीन वसतिगृहाचे भूमिपूजन

मुलींसाठीच्या तिसऱ्या वसतिगृहाच्या कामाचे २१ फेब्रुवारीला भूमिपूजन झाले. लजपतराय भवन वसतिगृहाच्या आवारात आधुनिक सुविधांसह हे वसतिगृह उभारण्यात येणार आहे. या वसतिगृहामुळे आणखी २५० विद्यार्थिनींचे पुण्यात येऊन उच्चशिक्षण घेण्याचे स्वप्न पूर्ण होईल.



## समिती दर्पण सुरू

समितीच्या घटना-घडामोडींची माहिती देणगीदार, हितचिंतक, कार्यकर्ते, सल्लागार, माजी विद्यार्थी यांच्यापर्यंत पोचविण्यासाठी सप्टेंबरपासून समिती दर्पण हे द्वैमासिक सुरू करण्यात आले. द्वैमासिक डिजिटल स्वरूपात असणार आहे.

## वसुधाताई परांजपे स्मृतिदिन

समितीच्या माजी कार्यकारी विश्वस्त वसुधाताई परांजपे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ (१५ जानेवारी) परांजपे कुटुंबीयांतर्फे मूलगामी स्वरुपाचे काम करणाऱ्या दोन व्यक्तींना सन्मानित करण्यात आले.अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. नागनाथ कोतापल्ले यांच्या हस्ते शैक्षणिक क्षेत्रातील कार्याबद्दल मुंबई विद्यापीठातील जर्मन भाषेच्या प्राध्यापक व मराठी भाषा प्रसारक डॉ. विभा सुराणा यांना'वसुधा परांजपे



स्मृती शिक्षणसेवा पुरस्कार', तर सामाजिक कार्याबद्दल परिसर संस्थेचे प्रकल्प संचालक रणजित गाडगीळ यांना'वसुधा परांजपे स्मृती समाजसेवा पुरस्कार'प्रदान करण्यात आला. मानपत्र, पुष्प व रोख ५० हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी परांजपे कुटुंबीयांकडून समितीमधील पाच विद्यार्थिनींना प्रत्येकी १० हजार रुपयांची शिष्यवृत्ती जाहीर झाली.

## उद्योजकता विकास केंद्राचे उद्घाटन

समितीने उभारलेल्या उद्योजकता विकास केंद्राचे उद्घाटन समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्या हस्ते २० मार्च रोजी झाले. यावेळी विद्यार्थ्यांनी सुरू केलेल्या प्रायोगिक व्यवसायाचे सादरीकरण झाले व प्रदर्शनही भरविण्यात आले.

## प्रवेश ऑनलाइन

समितीची प्रवेशप्रक्रिया डिसेंबरमध्ये सुरू झाली. जास्तीतजास्त गरजू विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रथमच ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया करण्यात आली. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरले. पात्र विद्यार्थ्यांना थेट मुलाखतीसाठी बोलावले. विद्यार्थी, पालकांचे हेलपाटे कमी झाल्याने त्यांचा वेळ आणि पैसे वाचले.

# माजी विद्यार्थ्यांच्या यशोगाथा

## समितीमुळे सामान्यांशी बांधील



मी मूळचा पाथर्डीचा. (जि. अहमदनगर) COEP ला (सिव्हिल) प्रवेश मिळाल्यावर राहण्यासाठी समितीबद्दल माहिती मिळाली. प्रयत्न केल्यावर मला लजपत भवन वसतिगृहात प्रवेश मिळाला. समितीतील नियम, शिस्त, उपक्रम माझ्या आयुष्याला वेगळे वळण लावून गेले. पालक म्हणून परांजपे बिल्डर्स यांचे बहुमूल्य मार्गदर्शन मिळाले. एका वर्षाच्या वास्तव्यात भरपूर आत्मविश्वास मिळाला. बारावीपर्यंत फक्त अभ्यास एके अभ्यासाची सवय असणाऱ्या माझ्यासाठी सामान्यज्ञानाच्या विविध स्पर्धांतील बक्षिसांमुळे भविष्यातील स्वप्नांना भरारी मिळाली. वाचनाची सवय लागल्याने UPSC मध्ये यश मिळाल्याचे मला प्रामाणिकपणे वाटते. अभिमानाने सांगावेसे वाटते की, आजपर्यंत हजारो विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी विनामूल्य मार्गदर्शन केले व त्यातील अनेक विद्यार्थी IPS, IAS पदांवर निवडले गेले आहेत. समितीच्या संस्कारांमुळे प्रामाणिकपणा व तळागाळातील सामान्यांशी नेहमीच बांधील राहिलो. त्याचे फळ म्हणजे यूएस, कॅनडा यांच्याकडून सन्मान झाला. दोन वेळा राष्ट्रपती पदकासाठी (२००४ व २०१३) निवड झाली. इतर अनेक पुरस्कारांनी सन्मानित झालो. मानवी तस्करीची पाळेमुळे संपवण्यात माझा पुढाकार असतो. कधी काळी अभ्यासासाठी वेळ वाचावा म्हणून सायकलच्या हँडलवर पुस्तक ठेऊन लजपत भवन ते COEP प्रवास करता करता आज चारी बाजूंनी पोलीस अधिकाऱ्यांच्या ताफ्यात वावरत प्रवास चालू असल्याचा अभिमान आहे. समितीच्या प्रत्येक घटकाबद्दल नितांत आदर आहे.

**महेश मुरलीधर भागवत,** (IPS/1995)
कमिशनर ऑफ पोलीस रचकोंडा (तेलंगणा)

---

## समितीने डोळस घडवले



ग्रामीण भागातील हुशार विद्यार्थ्यांच्या जीवनात समितीची भूमिका दीपस्तंभाची आहे. आज माझ्यासारखे सामान्य,कष्टकरी कुटुंबातील हजारो ग्रामीण विद्यार्थी स्वतःच्या पायावर आणि समितीने घालून दिलेल्या नैतिक आधारावर जीवनातील सर्वच क्षेत्रात यशस्वीपणे काम करताना दिसतात. समितीबद्दल माझा वैयक्तिक अनुभव नितांतसुंदर आहे. बारावीनंतर मी प्रथम शहरात आले. समितीत प्रवेश मिळाला (२००६ ते २००९) आणि माझ्या कच्च्या मातीच्या गोळ्याला आकार यायला सुरुवात झाली. हुशार असले तरी ग्रामीण भागातून आल्यामुळे थोडासा बुजरा स्वभाव होता, हळूहळू तो आत्मविश्वासात परावर्तित होत गेला. समितीच्या वास्तव्यात खूप गोष्टी शिकले, ज्याच्या पायावर आज लोकसेवेत सक्षमपणे कार्यभार पेलते आहे. सध्या माथेरान गिरीस्थानच्या मुख्याधिकारीपदी नियुक्ती आहे. पहिली नेमणूक खालापूर नगरपंचायतीच्या मुख्याधिकारीपदी झाली होती. अवघ्या १७ महिन्यांच्या कार्यकाळात तेथे स्वच्छता अभियान य़शस्वी करण्याबरोबर तेथील आदिवासी वाडीत पिण्याच्या पाण्याची योजना राबवत महिलांची कित्येक वर्षांची पायपीट थांबविता आली. तेथील कामाची पावती म्हणजे ग्रामस्थांबरोबरच पत्रकार आणि लोकप्रतिनिधींनी केलेला निरोप समारंभ. सरकारी अधिकाऱ्याच्या वाट्याला क्वचित असा कौतुकाचा सोहळा येतो. ते भाग्य मला लाभले. कोणत्याही गोष्टीकडे उघड्या डोळ्यांनी पाहण्याची दृष्टी समितीने दिली.

**– सुरेखा भणगे – शिंदे**
मुख्याधिकारी, माथेरान नगरपरिषद

## मायेची ऊब असलेले कुटुंब



बी. कॉमची पदवी घेईपर्यंत १९८६ ते ९० समितीच्या सुमित्रा सदनमध्ये राहिले. समितीतील विविध उपक्रमांमुळे अनुभवसमृद्ध होता आले. त्यातून सामाजिक कामाची आवड निर्माण झाली. समितीत जिवाभावाचे मित्र-मैत्रिणी, मायेची ऊब असलेले कुटुंब मिळाले. पुढे कर्वे समाज सेवा संस्थेमध्ये एमएसडब्ल्यू केले. २००१ पासून जनसेवा प्रतिष्ठान विटा या संस्थेची अध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळते आहे. बालहक्क अभियान, महिला सुमपदेशन व मदत केंद्र यातून अनेक उपक्रम राबविले. शिवभोजन केंद्र संचलित मार्च-एप्रिल २०१६ पासून आतापर्यंत दीड लाख थाळी दिल्या आहेत. या सर्व कार्यामुळे आदर्श संस्था आणि अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार झाला. विविध पुरस्काराने सन्मानित होता आले. आशिया सामाजिक परिषदेसाठी थायलंड, फिलिपिन्स, जपान, बाली, मलेशिया, सिंगापूर येथे भारतातर्फे प्रतिनिधित्व करता आले.

**- कुमुदिनी नष्टे (शेटे)**
अध्यक्ष, जनसेवा प्रतिष्ठान, विटा

## माणसं घडविण्याचा कारखाना



शेतीत काम करत, शिक्षण घेताना बारावी उत्तम गुणांनी पूर्ण करून सीइटीत फलटण केंद्रात प्रथम आल्यावर उच्च शिक्षणासाठी पुण्यात आलो. अष्टांग आयुर्वेद महाविद्यालयात प्रवेश मिळाला. पण राहण्याचा प्रश्न होता. गावी आईवडिलांचे कष्ट बघवत नव्हते. मला समितीची माहिती मिळाली, अर्ज केला. खूप चकरा मारायला लागल्या. शेवटी प्रवेश मिळाला. स्वावलंबन, स्वयंशिस्त, स्वच्छता हे समितीचे ब्रीद माझ्यात हळूवळू रुजत गेले. गटचर्चा, योगवर्ग यात रमू लागलो. कमवा व शिका मनापासून केली. वक्तृत्व, वादविवाद स्पर्धामध्ये जिंकलो. केस या छोट्या विषयावर काम सुरू केलं. पुढे जाऊन हे काम खूपच विकसित झाले. केशायुर्वेद या भारतातील पहिल्या आयुर्वेदिक हेअर टेस्टिंग लॅबची निर्मिती झाली. रशिया, ऑस्ट्रेलिया, दुबई, नेदरलँड अशा अनेक देशात व भारतात एकूण १०८ शाखा निर्माण झाल्या. यातूनही वेळ काढून समितीत जातो. समिती म्हणजे माणसं घडविण्याचा कारखाना आहे, आम्ही नशीबवान आहोत आम्हाला यात घडायला मिळाले.

**- वैद्य हरिश पाटणकर,**
भारत व रशियातील प्रसिद्ध आयुर्वेद चिकित्सक

## जो काही आहे तो समितीमुळे



मला बारावीत असताना समितीत प्रवेश मिळाला तेथील शिस्तीमुळे व अनुकूल वातावरणामुळे चांगले गुण मिळवता आले. पुढे COEP ला इंजिनिअरिंगसाठी प्रवेश मिळाला. एका वर्षाच्या वास्तव्यात समितीने जे दिले ते शब्दातीत आहे. गरिबीतून आलेला मी एकटाच नाही ही जाणीव झाली. खोली आणि परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी आपली स्वतःची आहे हा संस्कार मला माझ्या नगराध्यक्षपदाच्या कारकिर्दीत उपयोगी आला. समितीच्या पालकत्व योजनेचा मला विशेष लाभ झाला. मी बारावीत ड्रॉप घेण्याच्या मानसिकतेत होतो. त्यावेळी माझ्या पालक सरोज पाटील यांनी मला नैराश्यातून बाहेर काढले. तांबोळी सरांचे ऋण मी कधीही विसरू शकत नाही. इंजिनिअर झाल्यावर दोन वर्ष नोकरी केली. त्यानंतर स्वतःचा बांधकाम व्यवसाय माथेरानला सुरू केला.'रिसॉर्ट' सुरू केले. २००६ मध्ये माथेरान नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी निवड झाली. मी आज जो काही आहे तो समितीमुळे. माथेरानमध्ये आमचे मालकीचे घर नव्हते ते झाले. माझ्यासारख्या अनेक विस्थापितांना प्रस्थापित करण्याचे काम विद्यार्थी सहायक समिती करत आहे.

**- मनोज खेडेकर,** बांधकाम व्यावसायिक,
माजी नगराध्यक्ष, माथेरान नगरपरिषद

# साहाय्यदात्यांच्या भावना

## कार्य भावल्यामुळेच देणगीचा निर्णय



विद्यार्थी साहाय्यक समितीशी माझा परिचय सुभाषचंद्र भोसले यांच्या माध्यमातून झाला. त्यांनी मला कमवा व शिका अंतर्गत मनुष्यबळासाठी तुषार रंजनकर यांच्याशी संपर्क साधण्यास सांगितले. तुषारजींबरोबर मोबाइलवरून दोन–तीन वेळा संपर्क साधल्यानंतर मला विद्यार्थी साहाय्यक समितीच्या विविध उपक्रमांची माहिती झाली. त्यातून समितीचे कार्य मला भावले. पुणे परिसर विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी ही संस्था उत्कृष्ट काम करत आहे. समिती विद्यार्थ्यांना केवळ राहण्याची आणि भोजनाची व्यवस्था करत नाही तर त्यांच्या व्यक्तिमत्त्व आणि चारित्र्य विकासासाठीही काम करते. समितीच्या व्यवस्थापन समितीतील सदस्य निस्वार्थीपणे आणि समर्पित वृत्तीने विद्यार्थी आणि संस्थेच्या हितासाठी झटतात. मुलींसाठीच्या नवीन वसतिगृहाच्या भूमिपूजन समारंभाला मी उपस्थित होतो आणि या कार्यक्रमातच मी उत्स्फूर्तपणे अडीच कोटी रुपयांची देणगी देण्याचा निर्णय घेतला. समितीच्या कामासाठी माझे सर्वतोपरी सहकार्य आणि शुभेच्छा कायम राहतील.

– **नितीन कारिया**, इंजिनिअर्स अँड कॉन्ट्रक्टर्स,
रतिलाल भगवानदास कन्स्ट्रक्शन कंपनी

## निष्ठेने होणाऱ्या कामासाठी पाठबळ



महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून येणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाची निवास व भोजन व्यवस्था वाजवी दरात पुरविण्याचे काम विद्यार्थी साहाय्यक समिती करत आहे. त्यांचे आजवरचे काम आणि ज्या निष्ठेने ते गरजू विद्यार्थ्यांना मदत करतात ते पाहून आम्ही, आत्मजा फाउंडेशनच्या माध्यमातून तेथील काही मुलींना आर्थिक साहाय्य करत आहोत. त्याशिवाय त्यांच्या बिल्डिंग फंडासाठीही आम्ही काही रक्कम दिली ज्यामुळे त्यांना हे काम पुढे न्यायला मदत होईल. हे चांगले काम त्यांनी असेच चालू ठेवावे.

– **प्रीती राव**, संस्थापक, आत्मजा फाउंडेशन

## विद्यार्थ्यांचे यश हीच विश्वासार्हता



विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कार्याशी मी गेल्या अनेक वर्षांपासून परिचित आहे आणि भारत फोर्ज कंपनी या संस्थेशी २०१४ –१५ पासून औपचारिकरीत्या जोडली गेली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीचे विविध उपक्रम समिती सातत्याने राबवते. तसेच कौशल्य विकासासाठीही प्रयत्न करते. समितीचे काम पाहताना एक विशेष गोष्ट लक्षात आली ती म्हणजे येथे स्त्री–पुरुष समानतेला महत्त्व दिले जाते. त्यामुळे ग्रामीण भागातील सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना उच्च शिक्षण घेण्याची आणि यशस्वी स्वयंपूर्ण होण्याची संधी मिळते. समितीच्या प्रयत्नांमुळे विद्यार्थी त्यांचे शिक्षण पूर्ण करतातच, शिवाय स्वतःच्या पायावर उभे राहतात. समितीकडून योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळत असल्यामुळेच हे शक्य होते. ज्या ज्या वेळी मी समितीत जाते आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधते त्या त्या वेळी मला आनंद आणि प्रेरणा मिळते. कोणत्याही संस्थेचे यश हे तेथील विद्यार्थ्यांच्या यशावर अवलंबून असते. विद्यार्थी साहाय्यक समिती ही अशी संस्था आहे की तेथील विद्यार्थ्यांचे यशच समितीची विश्वासार्हता सिद्ध करतात.

– **लीना देशपांडे,** असोसिएट, व्हाइस प्रेसिडेंट एच. आर.
आणि सीएसआर हेड, भारत फोर्ज

## समान उद्दिष्टांमुळे जडला स्नेह

विद्यार्थी साहाय्यक समिती, पुणे आणि अक्षय पात्र फाउंडेशन यांचे साधारण चार वर्षांपासून एकत्रित काम सुरू झाले. दोन्ही संस्था भारताच्या उज्ज्वल भवितव्याचे ध्येय समोर ठेवून समाजातील गरीब, उपेक्षित घटकांसाठी कार्यरत आहेत. दोन्ही संस्थांचे उद्दिष्ट समाजातील गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदत करणे हेच आहे. अक्षय पात्र प्रामुख्याने शालेय विद्यार्थ्यांमधील भुकेची समस्या हाताळण्यासाठी योगदान देत आहे तर समिती ग्रामीण भागातील गरजू महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना पुण्यात उच्च शिक्षणासाठी आल्यावर अल्पदरात निवास, भोजन आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या संधी उपलब्ध करून देत आहे. २०१९ पासून अक्षय पात्र समितीच्या सुमारे ७०० विद्यार्थ्यांना दोन वेळचे जेवण उपलब्ध करून देण्याची सेवा देत आहे. समितीचे पदाधिकारी, ज्यात प्रामुख्याने माजी विद्यार्थ्यांचा समावेश आहे ते संस्थेचे कार्य अत्यंत समर्पक आणि शुचितेने पुढे नेत आहेत. त्यांचे आणि इतर कार्यकर्त्यांचे निःस्वार्थ कार्य पाहूनच अक्षय पात्रला समितीबरोबर स्नेह निर्माण करण्याची प्रेरणा मिळाली. समितीची ६७ वर्षांची प्रदीर्घ वाटचाल आहे. अक्षय पात्र आज मितीला समितीसोबत आहे, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे आणि हे ऋणानुबंध असेच कायम राहोत ही अपेक्षा. समितीचे कार्य उत्तरोत्तर वाढून युवा पिढी आणि देश घडविण्याचे हे कार्य असेच अविरत सुरू राहो, ही शुभकामना.

**– अक्षय पात्र परिवार**

# आमचे कॉर्पोरेट क्षेत्रातील साहाय्यदाते

भारत फोर्ज लि.
सिपोरेक्स इंडिया प्रा. लि.
एपिरॉक मायनिंग इंडिया लि.
कमिन्स इंडिया फाउंडेशन
कल्याणी टेक्नोफोर्ज लि.
साई सर्व्हिस स्टेशन पुणे
डेलवाल फ्लो कंट्रोल्स प्रा. लि.
पर्सिस्टंट फाउंडेशन,
साबा सॉफ्टवेअर (इं.) प्रा. लि.
यामाझाकी मझाक इंडिया प्रा. लि.
सोनाई दूध कंपनी लिमिटेड, इंदापूर

# आर्थिक मदत देणारे ट्रस्ट

- स्वाधार
- स्नेहसेवा
- दिशा परिवार
- आत्मजा फाउंडेशन
- एन. जी. भोसले ट्रस्ट
- ए. यू. एम. चॅरिटेबल ट्रस्ट
- सुपर्णा चॅरिटेबल ट्रस्ट
- एस. टी. भटेवरा फाउंडेशन
- मराठवाडा मित्रमंडळ
- लीला पूनावाला फाउंडेशन
- लिमये गंगा मोरेश्वर ट्रस्ट फंड
- स्वादी चॅरिटेबल ट्रस्ट
- महाराष्ट्र फाउंडेशन
- सावली चॅरिटेबल ट्रस्ट
- शिवसह्याद्री चॅरिटेबल ट्रस्ट
- शंकरराव पाटील चॅरिटेबल ट्रस्ट
- विश्वकर्मा पर्पल एज्युकेशन ट्रस्ट
- सेवा सहयोग फाउंडेशन
- देवी चतु:श्रृगी मंदिर ट्रस्ट
- लेंड अ हॅण्ड इंडिया
- शुटिंग स्टार्टस फाउंडेशन
- शिवाजीनगर महिला मंडळ विद्यार्थी निधी
- अभियांत्रिकी महाविद्यालय विद्यार्थी साहाय्यक संस्था
- उत्तुर सर्वोत्तम शेणॉय मेमोरिअल फाउंडेशन
- हेमलता विनायक फाउंडेशन फॉर सोशल वेलफेअर
- गिरिलता पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट
- कै. वसंत आणि मंगला कुलकर्णी मेमोरिअल ट्रस्ट
- पंढरीनाथ गोपाळ ठकार एज्युकेशन ट्रस्ट
- लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख चॅरिटेबल ट्रस्ट
- पाटण एज्युकेशनल अँण्ड डेव्हलपमेंट ट्रस्ट

AUDITED FINANCIALS
VIDYARTHI SAHAYYAK SAMITI, PUNE

Registration No. : E-219 PAN: AAATS4498N

THE BOMBAY PUBLIC TRUST ACT 1950,
SCHEDULE IX [Vide Rule 17 (1)]

Amount in Rupees

Income & Expenditure for the year Ending 31st March 2022

| 2020-21 | Expenditure | 2021-22 | 2020-21 | Income | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|
| | **Expenditure in respect of properties** | | 5,71,325 | **Rent** | 7,36,032 |
| 11,94,253 | Rates, Taxes, cesses | 10,21,788 | | **Interest** | |
| 96,44,986 | Major Repairs | 2,20,79,282 | 96,30,218 | On Bank Account. - on deposits. | 73,77,258 |
| 15,19,549 | **Salaries & Terminal Benefits** | 13,86,662 | 1,76,903 | - on saving a/c. | 1,33,260 |
| 6,47,153 | **Establishment Expenses** | 14,62,040 | 4,559 | Dividend | |
| 9,440 | Legal Expenses. | | 77,84,514 | **Donation in cash or kind** | 1,23,14,327 |
| 49,150 | Audit fees & Professional fees | 20,000 | 7,08,503 | Income from other sources | 82,33,762 |
| | | | 16,81,467 | Transfers from Reserves/Liabilities | 16,74,423 |
| 39,44,596 | **Depreciation** | 42,90,757 | | | |
| 98,182 | Transferred to Reserves / Specific Funds. | | 64,32,562 | Deficit c/f to Balance Sheet | 1,32,41,453 |
| | **Expenses on object of trust** | | | | |
| 95,69,584 | Educational /Relief to poor | 1,30,12,302 | | | |
| 3,13,158 | Medical Relief | 4,37,684 | | | |
| **2,69,90,051** | **Total** | **4,37,10,515** | **2,69,90,051** | **Total** | **4,37,10,515** |

As per our Report on Even date

Dated : 26th August 2022
Place: PUNE

| **Tukaram Gaikwad** | **Prataprao G. Pawar** | **CA Santosh Pethe** |
|---|---|---|
| Managing Trustee | President | Torvi Pethe & Co |

## AUDITED FINANCIALS
## VIDYARTHI SAHAYYAK SAMITI, PUNE

Registration No. : E-219 PAN: AAATS4498N

THE BOMBAY PUBLIC TRUST ACT 1950,
SCHEDULE IX [Vide Rule 17 (1)]

Amount in Rupees

BALANCE SHEET AS ON 31ST March 2022

| 31/03/2021 | Funds & Liabilities | 31/03/2022 | 31/03/2021 | Property & Asstes | 31/03/2022 |
|---|---|---|---|---|---|
| | **Trust funds or Corpus** | | 2,74,08,535 | Immovable Properties | 4,56,32,721 |
| 9,24,09,242 | Trust funds or Corpus | 9,85,44,060 | 83,11,631 | Furniture & Fixture. | 1,10,26,460 |
| 9,49,06,485 | Other Earmarked Funds | 10,38,12,993 | 16,04,74,771 | Investments. | 14,40,66,960 |
| | **Liabilities.** | | 53,93,681 | Advances | 42,99,952 |
| 10,43,464 | For Expenses | 29,42,949 | | | |
| 23,00,608 | For Advances- Over Draft | 10,83,518 | 92,173 | Income Outstanding - Mess Closing Stock | 2,57,441 |
| | **Income and Expenditure Account** | | | **Cash & Bank Balance** | |
| 1,27,35,975 | Bal as per last Bal. Sheet: | 1,27,35,975 | 16,92,898 | Saving Account | 4,84,478 |
| | Add : Surplus | - | 22,085 | Cash in hand | 12,213 |
| | Less: Deficit current year | (1,32,41,453) | | | |
| | Less:Trf to Repairs/ Reserve Fund | (97,817) | | | |
| **20,33,95,774** | **Total** | **20,57,80,225** | **20,33,95,774** | **Total** | **205,780,225** |

As per Report on even date.

Dated : 26th August 2022
Place: PUNE

| Tukaram Gaikwad | Prataprao G. Pawar | CA Santosh Pethe |
|---|---|---|
| Managing Trustee | President | Torvi Pethe & Co |

# ऑडिट रिपोर्ट

To
**The Board of Trustees,**
Vidyarthi Sahayyak Samiti,
1184/1/4 F.C. Road,
Pune 411 005.

As per our appointment, we have audited the attached Balance Sheet of Vidyarthi Sahayyak Samiti as at March 31, 2022 and also the Income and Expenditure Account for the year ended on that date annexed thereto. These financial statements are prepared by incorporating the accounts of the Trust.

These financial statements are the responsibility of the Management. Our responsibility is to express an opinion on these financial statements based on our audit. We have conducted our audit in accordance with auditing standards generally accepted in India. These standards require that we plan and perform the audit to obtain the reasonable assurance about whether the financial statements are free of material misstatements. An audit includes examining evidence supporting the amounts and disclosures in the financial statements. An audit also includes assessing the accounting principles used and significant estimates made by the management, as well as evaluating the overall financial statement presentation. We believe that our audit provides a reasonable basis for our opinion.

**We further report that:**

a) We have obtained all the information and explanations, which to the best of our knowledge and belief were necessary for the purposes of our audit.
b) The Balance Sheet and Income & Expenditure Account dealt with by this report are in agreement with the books of account.
c) In our opinion, the Trust has kept proper books of account as required by law so far as it appears from our examination of these books.
d) In our opinion the Balance Sheet and Income & Expenditure Account comply with relevant Accounting Standards, exceptions mentioned in respect AS-9 on Revenue Recognition.

In our opinion and to the best of our information and according to the explanation given to us, these financial statements together with the schedules attached thereto and read with the Accounting Policies and Notes Forming Part of the Accounts give a true and fair view in conformity with the Accounting Principles generally accepted in India :

i] In case of Balance Sheet, of the state of affairs of the Trust as at March 31, 2022.
ii] In case of Income & Expenditure Account, of the Surplus / (deficit) for the year ended on that date.

**CA Santosh Pethe**
Torvi Pethe & Co

# आमचे नेतृत्व

## कार्यकर्ता मंडळ

अरुणा अत्रे
अभय व्यवहारे
गणेश कळसकर
हेमंत राजहंस
मनीषा गोसावी
नंदकुमार देशपांडे
प्रकाश टेके
रमा देसाई
राजेंद्र ततार
शशी भाटे
श्रीधर कुलकर्णी
स्नेहा फडके
तुषार रंजनकर

अनिल खेतमाळीस
चंद्रशेखर दांडेकर
गणेश काळे
जिभाऊ शेवाळे
मकरंद जोगळेकर
नंदकुमार तळेकर
प्रभाकर वाल्हेकर
रमेश घोटीकर
रमाकांत तांबोळी
सुभाषचंद्र भोसले
श्यामला जोशी
सुधीर राजगुरू
उषा पालेकर

अनिल कुलकर्णी
ज्ञानेश्वर खैरे
हरिश अष्टेकर
मधुसूदन बडवे
मेधा पंडित
प्रीती गोखले
रोहिणी डाके
रत्नाकर मते
संजय अमृते
सुनिल चोरे
सुप्रिया केळवकर
सुनीता झिंजाड
वासंती नाटेकर, कार्यवाह

अंकुश तळेकर
दिनकर वैद्य, अध्यक्ष
हरिश पाटणकर
मनोज गायकवाड
निसार चौगुले
प्रदीप मांडके
रवींद्र देशपांडे
रवींद्र नामजोशी
सुहासिनी बिवलकर
सोपान गोंटला
सुनंदा पाटील
तुकाराम गायकवाड
विनया ठोंबरे

## सन्माननीय कार्यकर्ते

वसंतराव गिंडी
नामदेव पाटील

प्रदीप तळवलकर
प्रकाश अकोलकर

नामदेव खमितकर
अशोक पाथरकर

## सल्लागार मंडळ

प्राचार्य भाऊसाहेब जाधव (अध्यक्ष)
डॉ. प्रकाश दीक्षित
सुनंदा माने
डॉ. रवींद्रसिंह परदेशी
उल्का कळसकर
प्राचार्य संजय चाकणे
अरुणा औटी

सुप्रिया केळवकर (कार्यवाह)
डॉ. (कॅ.) चंद्रशेखर चितळे
तेज निवळीकर
प्राचार्य देविदास गोल्हार
ज्योत्स्ना एकबोटे
डॉ. वैशाली साकोरे
प्राचार्य व्ही. एम. सोलापूरकर

मेधा पंडित
डॉ. एस. व्ही. वाघमारे
प्राचार्य व्ही. आर. राव
प्राचार्य विठ्ठल बांदल
प्राचार्य पी. बी. बुचडे
डॉ. ज्योती गोगटे
प्रा. संजय खरात

## सन्माननीय सल्लागार

डॉ. ए. डी. शाळीग्राम
डॉ. मालती अनगोळ

प्रा. सुरेश तोडकर
डॉ. एन. एस उमराणी

डॉ. डी. आर. नंदनवार

## मुख्य कार्यकारी अधिकारी

चंद्रकांत कुलकर्णी

## खजिनदार

संजय अमृते

# समितीच्या कार्यात आपण अशा प्रकारे सहभागी होऊ शकता

(समितीला मिळणाऱ्या देणग्या आयकर खात्याचा ८० G कलमानुसार कर सवलतीस पात्र आहेत.)

सामान्य किंवा विशिष्ट कॉर्पससाठी (उदा. इमारत निधी) देणगी देणे.

७५० विद्यार्थ्यांच्या एकावेळच्या भोजनासाठी येणारा रु. ११,८०९ इतका खर्च अन्ननिधी योजनेखाली देणगी म्हणून देणे.

पालकत्व योजनेसाठी वार्षिक रु. २५,००० देऊन एका विद्यार्थ्याचे मार्गदर्शक/पालक होणे.

समितीला प्रत्येक विद्यार्थ्यामागे एका वर्षात येणारी रु. २८,००० इतकी तूट भरून येण्यासाठी एका विद्यार्थ्याचा खर्च उचलणे.

समितीतील हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे.

समितीला उपयोगी पडतील अशी उपकरणे /वस्तू /पुस्तके यांची भेट देणे.

समितीच्या कमवा व शिका योजनेखाली एका किंवा जास्त विद्यार्थ्यांना काम देणे.

समितीने अनेक प्रकल्प हाती घेतले आहेत. उदा. २५० मुलींसाठी नवे वसतिगृह बांधणे. असा प्रकल्पामध्ये एक खोली / कक्ष / पूर्ण इमारत / फर्निचर/ सौर ऊर्जा यंत्रणा अशा गोष्टींसाठी देणगी देणे.

नव्याने बांधण्यात येणाऱ्या वसतिगृहात आपल्या प्रियजनांच्या स्मरणार्थ खोलीसाठी आपण देणगी देऊ शकता. व्यक्तिगत किंवा कुटुंबियांच्या वतीने ही देणगी देता येईल. एका खोलीसाठी रुपये १० लाख अपेक्षित खर्च आहे. ही रक्कम दोन - तीन वर्षांतही देऊ शकता.

CSR/ संस्थात्मक आर्थिक मदत मिळवून देणे.

समितीचा कार्यकर्ता म्हणून कार्याला वेळ देणे.

विद्यार्थी विकास केंद्राच्या उपक्रमात विद्यार्थ्यांसाठी आपल्या क्षेत्रातील तज्ज्ञ म्हणून महत्त्वाच्या विषयांवर संवाद साधणे.

# विद्यार्थी साहाय्यक समिती, पुणे

(Public Charitable Trust No. E- 219 Pune)


११८२/१/ ४, शिवाजीनगर, फर्ग्युसन कॉलेज रस्ता, पुणे – ४११००५
E mail : info@samiti.org, www.samiti.org
Mob. : 9404855530


Donations may be made by cheque drawn in favour of
VIDYARTHI SAHAYYAK SAMITI, PUNE
Donations given are eligible for deduction
under sec. 80 G of Income Tax Act.

Pan No. : AAATS4498N

**समितीला देणगी देण्यासाठी बँकेची माहिती**
**स्थानिक (भारतातील) देणगीदारांसाठी**

ICICI Bank : A/C No.000501060326
IFSC : ICIC0000039
Branch : Shivajinagar, Pune

**परदेशस्थ देणगीदारांसाठी**

State Bank Of India, Main Branch, New Delhi
A/C No. : 40282102047 (FCRA Saving Account)
Branch Code : 00691
IFSC : SBIN0000691
SWIFT CODE : SBININBB104

आपण देणगी ऑनलाइन जमा केल्यावर पावतीसाठी आपला पॅन नंबर, पत्ता, मेल आयडी व फोन ही माहिती समितीला info@samiti.org या मेलवर कृपया कळवावी.